ग्रामपंचायत हद्दीमधील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या क्षेत्रातील मिळकतींकडून करांची वसुली ग्रामपंचायतीच्या वतीने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून करणे

## महाराष्ट्र शासन

### ग्राम विकास विभाग

### शासन निर्णय क्रमांकः व्हीपीएम-२०१६/प्र.क्र. १८९/पंरा-४

बांधकाम भवन, मर्झबान पथ, २५,
मंत्रालय, फोर्ट, मुंबई-४०० ००१
दिनांक: १३ सप्टेंबर, २०१९

**वाचा - शासन अधिसूचना क्रमांकः व्हीपीएम-२०१६/प्र.क्र.१८९/पंरा-४ दिनांक ११ सप्टेंबर, २०१९**

**प्रस्तावना -**

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमामधील, कलम १२४ व त्याअंतर्गत महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी (शुल्क) नियम १९६०, नुसार ग्रामपंचायत हद्दीमध्ये विविध कर व फी यांची आकारणी व वसुल करण्याचे अधिकार ग्रामपंचायतींना आहेत. ग्रामपंचायत हद्दीमधील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या क्षेत्रातील जमीन, इमारती व मालमत्ता यांवरील सामान्य आरोग्य रक्षण उपकर (स्वच्छता कर) व दिवाबत्ती कर यांसहित मालमत्ता कर यांची वसुली ग्रामपंचायतीच्या वतीने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून करण्याबाबत संदर्भिय शासन अधिसूचना निर्गमित करण्यात आली आहे. त्यानुषंगाने अनुसरावयाच्या कार्यपद्धतीबाबत सूचना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय -**

ग्रामपंचायत हद्दीमधील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या क्षेत्रातील जमीन, इमारती व मालमत्ता यांवरील सामान्य आरोग्य रक्षण उपकर (स्वच्छता कर) व दिवाबत्ती कर यांसहित मालमत्ता कर यांची वसुली ग्रामपंचायतीच्यावतीने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून करण्याबाबत संदर्भिय शासन अधिसूचना निर्गमित करण्यात आली आहे.

त्यानुषंगाने कर संकलन/वसुली संदर्भात अनुसरावयाच्या कार्यपद्धतीबाबत पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहे.

१) ग्रामपंचायती आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने संदर्भीय शासन अधिसूचनेन्वये कार्यवाही करावी.

२) ग्रामपंचायत हद्दीमधील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या क्षेत्रातील जमीन, इमारती व मालमत्ता यांवरील सामान्य आरोग्य रक्षण उपकर (स्वच्छता कर) व दिवाबत्ती कर यांसहित मालमत्ता कर यांची वसुली ग्रामपंचायतीच्यावतीने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने करावयाची आहे.

३) त्यानुसार ग्रामपंचायतीने महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी नियम, १९६० मधील तरतुदीनुसार प्रचलित पद्धतीनुसार त्यांच्या हद्दीमधील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या क्षेत्रातील मिळकतींवर कर आकारणी करावी.

४) त्याची देयके महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या स्थानिक कार्यालयाकडे देण्यात यावी.

५) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने सदरील देयके संबंधितांना बजावून व ग्रामपंचायतीच्यावतीने कर वसुली करावी व त्याबाबतची संबंधितांना पावती द्यावी.

६) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने वसूल केलेल्या कराच्या एकूण रकमेपैकी ५० टक्के इतकी रक्कम स्वत:कडे ठेवून उर्वरित ५० टक्के इतकी रक्कम ग्रामपंचायतीस द्यावयाची आहे.

७) त्याकरिता ग्रामपंचायतीने ग्रामनिधीबाबतचे बँक खाते क्रमांक संबंधित गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांच्याकडून प्रमाणित करून महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास उपलब्ध करून देण्यात यावे.

८) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने प्रत्येक महिन्याच्या सात तारखेपर्यंत मागील महिन्यात वसूल झालेल्या कराच्या एकूण रकमेपैकी ५० टक्के इतकी रक्कम महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने स्वत:कडे ठेवून उर्वरित ५० टक्के इतकी रक्कम ग्रामपंचायतीच्या ग्रामनिधीबाबतच्या बँक खात्यावर हस्तांतरित करावी. तसेच यासंदर्भात मिळकतनिहाय थकबाकीदार व वसुली झालेली रक्कम त्यांना देण्यात आलेल्या पावतीच्या प्रतीसह सविस्तर माहिती देण्यात यावी.

९) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व ग्रामपंचायत स्तरावर यासंदर्भात स्वतंत्र लेखे ठेवण्यात यावे.

१०) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने स्वत:च्या साधनांचा/पर्यायांचा आकर्षक वापर करुन कर वसुलीसाठी प्रयत्न करावा.

११) महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम व त्याअंतर्गत केलेले नियम यांमधील तरतुदींनुसार ग्रामपंचायतीने थकबाकीदारांवर विहित पद्धतीने कार्यवाही करावी.

१२) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने स्वत:कडे ठेवलेल्या ५० टक्के रकमेचा विनियोग हा या कर वसुलीकरिता येणारा प्रशासकीय खर्च आणि महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमामधील कलम ४५ मध्ये उल्लेख केलेल्या अनुसूची १ मधील ग्रामसूची मध्ये नमूद विषयांपैकी अ.क्र. २९, ३१, ३२, ३९, ४०, ४१, ४५, ५२, ५३ मधील विषयांबाबत कार्यवाही करण्यासाठी करावयाचा आहे. त्यानुषंगाने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची त्यांच्या क्षेत्रात सर्व प्रकारच्या सोयीसुविधा जसे की रस्ते, दिवाबत्ती, कचरा/घनकचरा व्यवस्थापन, गटारे, पाणीपुरवठा, अग्निशमन सेवा (उपलब्धतेनुसार) इत्यादी पुरवण्याची सर्वस्वी जबाबदारी आहे.

१३) ग्रामपंचायतीच्या वतीने वसुल केलेल्या करापोटी मिळणारी ५० टक्के रक्कम व वरील सोयींसुविधांसाठीचा खर्च यामध्ये महामंडळास तुट आल्यास अशी तुट भरून काढण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ मधील प्रकरण क्र. ३ खालील कलम १७ मधील तरतुदीच्या अनुषंगाने महामंडळाकडून त्यांच्या क्षेत्रातील औद्योगिक घटकांना सेवा शुल्काची आकारणी करण्यात येणार आहे.

१४) ज्या ग्रामपंचायतींकडून महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास देणी अदा करावयाची आहे त्या ग्रामपंचायतीला उक्त महामंडळाकडून वर्ग करण्यात येणाऱ्या रकमेमधून सदर देणी रक्कम वजा करण्यास हरकत नाही. मात्र महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास ग्रामपंचायतीकडून देय असलेल्या रकमेबाबत वाद असल्यास सदर देय रकमेबाबतचा वाद विहित पद्धतीने मिटविल्यानंतरच अशी रक्कम वजावट करण्यात यावी.

२. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी वरीलप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत आपल्या जिल्ह्यातील अधिनस्त सर्व संबंधित अधिकारी/कर्मचारी व सर्व ग्रामपंचायतींच्या निदर्शनास आणून अंमलबजावणी करुन घ्यावी.

३. सदरचा शासन निर्णय उद्योग विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९१३१०४६१३६४२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Aseem Surendrakumar Gupta

Digitally signed by Aseem Surendrakumar Gupta
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Developement Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=42cb1d992ceadc1f5fea3c14e1cedf9b5ea392a9c81fdbde5629e68c9158678b, cn=Aseem Surendrakumar Gupta
Date: 2019.09.13 13:33:44 +05'30'

**असीम गुप्ता**

प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१) मा. विरोधी पक्षनेता, विधान परिषद, विधानमंडळ, मुंबई.
२) मा. विरोधी पक्षनेता, विधान सभा, विधानमंडळ, मुंबई.
३) मा. विधानसभा/मा. विधान परिषद सदस्य ( सर्व)
४) मा. राज्यपाल यांचे सचिव
५) मा. मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव
६) मा.मंत्री ( ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव
७) मा. राज्यमंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव
८) मा. मुख्य सचिव यांचे सह सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
९) अपर मुख्य सचिव (उद्योग), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव सर्व मंत्रालयीन विभाग, मुंबई.
११) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई.
१२) महालेखापाल, महाराष्ट्र-१ मुंबई (लेखा व अनुज्ञेयता).
१३) महालेखापाल, महाराष्ट्र-२ नागपूर (लेखा व अनुज्ञेयता) .
१४) महालेखापाल (लेखापरीक्षा), महाराष्ट्र-१ मुंबई/महाराष्ट्र-२ नागपूर
१५) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
१६) सर्व मंत्रालयीन विभाग.
१७) सर्व विभागीय आयुक्त.

१८) सर्व जिल्हाधिकारी.
१९) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
२०) सर्व सह सचिव/ उप सचिव/ अवर सचिव/ कार्यासन अधिकारी ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन, मंत्रालय, मुंबई.
२१) सर्व उपायुक्त (विकास/आस्थापना), विभागीय आयुक्त कार्यालये.
२२) प्रधान सचिव (ग्राम विकास) यांचे स्वीय सहायक.
२३) विधिमंडळ ग्रंथालय, विधान भवन, मुंबई (१० प्रती).
२४) माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
२५) माहिती तंत्रज्ञान कक्ष (ग्रा.वि.वि), बांधकाम भवन, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई.
२६) आपले सरकार कक्ष (ग्रा.वि.वि), बांधकाम भवन, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई
२७) निवडस्ती, कार्यासन पंरा-४.